महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक- पीएसबी-०३१४/ प्र.क्र.३५४/ पोल-५अ, दि.१०/०२/२०२६

**विषय**:- पोलीस उप निरीक्षक (सरळसेवा ) परीक्षा -२०१६ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सुधारीत केलेल्या निकालानुसार अ- शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांचे पोलीस उपनिरीक्षक पदावर समावेशन करणेबाबत.

.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक- पीएसबी-०३१४/ प्र.क्र.३५४/ पोल-५अ, दि.१०/०२/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२१०१७१००२६४२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 11-02-2026 23:08:31

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण,माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पोलीस उप निरीक्षक (सरळसेवा) परीक्षा - २०१६ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सुधारीत केलेल्या निकालानुसार अ-शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांचे पोलीस उपनिरीक्षक पदावर समावेशन करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पीएसबी- ०३१४/प्र.क.३५४/पोल-५अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १० फेब्रुवारी, २०२६

**वाचा :-**

१) शासन पत्र समक्रमांक दि.०२.१२.२०१६,
२) उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यंचे पत्र क्र. १४४२(२)(२)/२०१६/१३-अ, दि.२३.०७.२०१८
३) शासन पत्र समक्रमांक दि.३१.०७.२०१८
४) शासन पत्र समक्रमांक दि.०४.०१.२०१९ व दि.०८.०१.२०१९
५) उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यंचे पत्र क्र. १४४२(२)(२)/२०१६/१३-अ, दि.०५.०३.२०१९
६) उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यंचे पत्र क्र. १४४२(२)(२)/२०१६/१३-अ, दि.२३.०४.२०१९
७) शासन पत्र समक्रमांक दि.०९.०५.२०१९
८) शासन पत्र समक्रमांक दि.१४.०८.२०१९
९) अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यंचे पत्र क्र. १४४२(२)(२)/२०१६/१३-अ, दि.०१.०७.२०२१
१०) शासन पत्र समक्रमांक दि.२९.११.२०२१

**प्रस्तावना:-**

पोलीस उपनिरीक्षक (सरळसेवा) परीक्षा-२०१६ करीता पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या ७५० पदांचे मागणीपत्र दि.०२.१२.२०१६ रोजीच्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले होते. त्यानुषंगाने आयोगाने परीक्षा प्रक्रिया राबवून त्यांच्या दि.२३.०७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये ७५० उमेदवारंची शिफारस यादी शासनास सादर केली. सदर शिफारस यादी पुढील कार्यवाहीकरीता दि.३१.०७.२०१८ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना पाठविण्यात आली. सदरहू शिफारसपात्र उमेदवारांचे दि.२२.१०.२०१८ पासून महाराष्ट्र पोलीस अॅकडमी, नाशिक येथे मुलभूत प्रशिक्षण सुरु करण्यात आले. शिफारस केलेल्या उमेदवारांपैकी ५७ उमेदवार पोलीस उपनिरीक्षक पदावर रुजू होण्यास इच्छूक नसल्याने त्यांच्या

जागी प्रतिक्षा यादीमधील उमेदवार उपलब्ध करुन देणेबाबत दि.०४.०१.२०१९ व दि.०८.०१.२०१९ च्या शासन पत्रान्वये आयोगास विनंती करण्यात आली.

पोलीस उपनिरीक्षक (सरळसेवा) परीक्षा-२०१६ संदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे दाखल असलेल्या मुळ अर्ज क्र.६९४/२०१८ प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दि. ०१.११.२०१८ रोजी दिलेले आदेश व सदर आदेशाविरुद्ध आयोगाने दाखल केलेल्या रिट याचिका क्र.९२/२०१९ या प्रकरणातील मा. उच्च न्यायालयाने दि.१०.०१.२०१ रोजी दिलेले आदेश तसेच मुळ अर्ज क्र.६३५/२०१८ व तस्तम अन्य न्यायिक या प्रकरणामध्ये मा. न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेश विचारात घेऊन आयोगाने पोलीस उपनिरीक्षक (सरळसेवा) परीक्षा-२०१६ चा सुधारीत निकाल प्रसिद्ध केला. सदर सुधारीत अंतिम निकालानुसार ४४ उमेदवार नव्याने शिफारसपात्र ठरले (खुला खेळाडू प्रवर्गाचे १ पद रिक्त ठेवले) . सदर नव्याने शिफारसपात्र ठरलेल्या ४४ उमेदवारांमुळे पूर्वीच्या निकालामध्ये शिफारसपात्र असलेले ४५ उमेदवार सुधारीत निकालामध्ये शिफारसपात्र ठरत नाहीत. सदर उमेदवारांची स्वतंत्र यादी आयोगाने शासनास पाठविली. सदर यादीवर “No Posts Available as per revised result (Initially Recommended)” असे नमूद करण्यात आले आहे. सदर अतिरिक्त ठरलेल्या ४५ उमेदवारांना रिक्त पदांचा आढावा घेऊन शासन सेवेत सामावून घेण्याचा निर्णय शासन स्तरावरुन घ्यावा असे आयोगाने त्यांच्या पत्रात नमूद केले आहे

दरम्यान पोलीस उपनिरीक्षक सरळसेवा परिक्षा-२०१६ मधील प्रतिक्षायादी मधून उमेदवारांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केली नसल्याने प्रतिक्षायादीमधून उमेदवारांची शिफारस करण्याबाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मुळ अर्ज क्र.२२९/२०१९ (श्री. गणेश कितुरे व इतर) व मुळ अर्ज क्र.११२१/२०१९ (श्री. काकासाहेब भिताडे व इतर) या प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दि.१०.१२.२०२० रोजी प्रतिक्षायादीमधून उमेदवारांची शिफारस करण्याबाबत आदेश दिले होते. सदर आदेशाविरूध्द महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेली रिट याचिका (स्टॅम्प) क्र.४६५/२०२१ मा.उच्च न्यायालयाने दि.१०.०६.२०२१ रोजीच्या आदेशान्वये फेटाळली. मा. उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रतिक्षायादीवरील ५७ उमेदवारांची शिफारसयादी दि.०१.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास पाठविली. सदर प्रतिक्षायादीतील ५७ उमेदवारांच्या शिफारस यादीमध्ये, आयोगाच्या सुधारित निकालानुसार शिफारसपात्र न ठरलेल्या तथापि पूर्वीच्या निकालानुसार सध्या कार्यरत असलेल्या ४५ उमेदवारांपैकी २७ उमेदवारांचा समावेश आहे व ३० उमेदवारांची नव्याने शिफारस करण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरीत १८ उमेदवार हे अ- शिफारसपात्र ठरले आहेत.

आयोगाच्या सुधारित निकालानुसार अ - शिफारस पात्र ठरण्याच्या प्रक्रियेत सदर ४५ उमेदवारांचा कोणताही सहभाग नसुन, आयोगाने घेतलेल्या निर्णयामुळे प्रस्तुत परिस्थिती उद्भवली आहे यासाठी सदर उमेदवार जबाबदार नाहीत. त्यामुळे सदर अ- शिफारस पात्र १८(४५ -२७) उमेदवारांचे पोलीस उपनिरीक्षक पदावर समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

पोलीस उपनिरीक्षक सरळसेवा परिक्षा-२०१६ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने निकाल सुधारीत केल्यामुळे पूर्वीच्या निकालामध्ये शिफारसपात्र असलेल्या तथापि, सुधारीत निकालानुसार अ- शिफारसपात्र ठरलेल्या ४५ उमेदवारांपैकी २७ उमेदवारांची प्रतिक्षा यादीमधून शिफारस झाली आहे. त्यामुळे उर्वरीत १८ उमेदवार हे अ- शिफारसपात्र ठरले आहेत. सदर १८ उमेदवारांचे पोलीस उपनिरीक्षक पदावर समावेशन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर १८ उमेदवारांची सेवाजेष्ठता ही प्रतिक्षायादीमधून शिफारस झालेल्या ५७ उमेदवारांनंतर निश्चित करण्यात यावी.

३. उपरोक्त निर्णयाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाने तात्काळ करावी तसेच उपरोक्त कार्यवाहीच्या अनुषंगाने पोलीस उपनिरिक्षक संवर्गाची बिंदुनामावली अद्ययावत करुन पुढील मागणीपत्र तयार करावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२१०१७१००२६४२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAVINDRA NAMDEV PATIL
Date: 2026.02.10 17:11:14 +05'30'

**( रविंद्र पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन,मुंबई
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय,मुंबई
३. मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४. अपर मुख्य सचिव (गृह),गृह विभाग, मंत्रालय,मुंबई
५. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना/प्रशासन), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
८. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२.सर्व पोलीस आयुक्त
१३.सर्व पोलीस अधीक्षक
१४.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१५.निवडनस्ती (पोल-५अ)